▶ वर्ष-३
■ अंक-४
www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २८ ऑगस्ट २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

पान-२

आर. एन. विद्यालयात चंद्रयानचे थेट प्रेक्षेपण



पान-५



जल वाहतुकीसाठी ठाणे लवकरच होणार सज्ज

पान-६

डिव्हाईन विन्सपायर फाऊंडेशन राबविणार महिलांमध्ये जनजागृती करिता एक कदम और संकल्पना





ज्योती पाटील यांच्यातर्फे दहिहंडी सराव शिबीर

पान-८

# जे मनसेच्या तुषार पाटलांना जमलं, ते दिवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांना का जमत नाही?


दिवा न्यूज सडेतोड / सुहास खंडागळे


**दिवा :** मनसेने दिवा स्टेशन परिसर फेरीवाला मुक्त करून दाखवला.सलग दोन दिवस मनसेने फेरीवाला मुक्त स्टेशन मोहीम राबवली.शहर नीटनेटकी दिसायला हवीत...शहरातील बहुसंख्य असणाऱ्या नागरिकांना रस्त्याने नीट पायी चालता यावे यासाठी प्रामाणिक धडपड करणाऱ्या मनसेच्या तुषार पाटील आणि त्यांच्या टीमचे कौतुक करायला हवे.तुषार पाटील यांनी मनावर घेतले तर ते बदल घडवू शकतात हे त्यांनी पुन्हा दाखवून दिले. दूरदृष्टी असणारी माणसे दिवा शहराला हवी आहे.


खरं तर शहर नीट ठेवणे हे महापालिका प्रशासनाचे काम....पण दिव्यात या प्रशासनाला कायमच सुट्टी असते की काय अशी शंका येते. निमुळते रस्ते फेरीवाल्यांनी व्यापले तरी ते दिवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांना दिसत नाहीत हे जगातील नवे आश्चर्य!









अखेर दिवा मनसेला रस्ते मोकळे करण्यासाठी रस्त्यावर उतरायला लागले.नागरिकांच्या करातून पालिकेचा पगार घेणाऱ्या पगारी नोकरांनी यातून थोडा बोध घ्यायला हवा.आपल्या नेमणूक ज्या कामासाठी झाल्या आहेत त्याची आठवण ठेवायला हवी. जी जबाबदारी पालिका प्रशासनाला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून मिळाली आहे, ती पार पाडता येत नसेल तर अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घरी बसायला हवे. (पान २ वर)

*दिव्याची लोकसंख्या साधारण पाच लाखांच्या घरात.या वाढतच चाललेल्या लोकसंख्येला किमान पायाभूत सुविधा आपण देऊ शकू का?याचा विचार प्रशासन करत नाही.अवघा दोन लेन चा दिवा आगासन हा प्रमुख रस्ता...मुंब्रा देवी कॉलनी रस्त्याला आकार उकार नाही..त्यात फेरीवाल्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजू आणि फुटपाथ व्यापले तर नागरिक चालणार कुठून?हा साधा प्रश्न दिवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांना पडत नाही.फेरीवाले हटवता येत नसतील तर पालिकेने संपूर्ण दिवा शहर फेरीवाला झोन म्हणून जाहीर करावे.*

*मनसेच्या आंदोलनाने थोडा जरी प्रकाश पडला असेल तर आता पालिकेने किमान दिवा स्टेशन परिसर,साबे गाव रोड आणि मुंब्रा देवी कॉलनी रोड मोकळा ठेवायला हवा.त्यासाठी पुन्हा मनसेला रस्त्यावर उतरायला लागले तर ते पालिका प्रशासनाचे सगळ्यात मोठे अपयश असेल...*

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३ | पान : २
www.diwanews.com



## प्रा. बाळासाहेब खोल्लम यांचे निधन

ठाणे : ज्ञानसाधना महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. बाळासाहेब खोल्लम यांचे दुपारी दोनच्या सुमारास राहत्या घरी निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. नालंदा भरतनाट्यम नृत्यनिकेतनचे ते संस्थापक होते. ठाण्यातील अनेक नामवंत कलाकार, राजकीय नेते त्यांचे शिष्य होते.



शिवसेनेच्या माध्यमातून बी.आर.नगर,प्रभाग क्रमांक २७ मध्ये महापालिकेच्या पुढाकाराने 'जंतू,किटक नाशक फवारणी करण्यात आली यावेळी चेंबर मध्ये आणि गटर लाईन मध्ये औषध फवारणी' करण्यात आली.प्रसंगी शिवसैनिक,कार्यकर्ते सूर्यकांत कदम, चेतन सरोज,सौ.रामेश्वरी पालांडे,मोहन गोळे,अनिल रजक इत्यादि कार्यकर्ते उपस्थित होते.बी.आर.नगर मधील रहिवाशांनी उपरोक्त सर्व पदाधिकारी आणि ठा.म.पालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## आईच्या चौथा पुण्यतिथी निमित्त गुजराती विकास मंडळ (दिवा) चे अध्यक्ष अशोक सोलंकी यांनी वृद्धाश्रममध्ये केले अन्नदान केले.



अशोक सोलंकी हे नियमित समाज सेवेत कार्यरत असतात, त्यात गोर गरिबांची सेवा करणे त्यांचे मुख्य ध्येय आहे. श्री अशोक सोलंकी यांनी आईच्या चौथ्या पुण्यतिथि निमित्ते दिवा स्थित अपना घर चेरिटेबल ट्रस्ट संचालित, वृद्धाश्रमाला भेट दिली, तेथील वृद्ध लोकांना जेवण, औषध, चश्मा आदी वस्तूंचे वाटप केले.

## जे मनसेच्या तुषार पाटलांना जमलं, ते दिवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांना का जमत नाही?

(पान १ वरून)

रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाले असल्याने नागरिक आपल्या घरी जाण्यासाठी १० मिनिटे रस्त्यावर गाडी पार्क करू शकत नाहीत, फेरीवाल्यांची लागलीच दादागिरी सुरू होते असे अनेक वाहन चालक सांगतात..रस्ते वाहनांसाठी की फेरीवाल्यांसाठी असा प्रश्न तेव्हा पडतो. नागरिकांना चालण्यास फुटपाथ न मिळणे,इमर्जन्सी मध्ये नागरिकांना स्वतः ची वाहने काही काळ का होईना पार्क करायला न मिळणे. रस्ते विद्रुप होणे हे असले प्रकार आधीच लहान असणाऱ्या रस्त्यावर फेरीवाले बसवल्याने निर्माण होतात. या प्रश्नांचा पालिका प्रशासनाने अभ्यास करावा. राहिला प्रश्न गोरगरीब फेरीवाल्यांचा तर त्यांना व्यवसायासाठी फेरीवाला झोन महापालिकेने आरक्षित करावा. ज्या ठिकाणी फेरीवाल्यांना आरक्षित भूखंड उपलब्ध करून देता येईल,किंवा जागा उपलब्ध करून देता येईल तिथे फेरीवाले बसवल्यास नागरिक स्वतःहून त्या मार्केटमध्ये खरेदीसाठी जातील.मुख्य रस्ते सोडून आतील रस्त्यांना फेरीवाला झोन करता येईल.रस्त्याच्या बाहेर हे मार्केट असल्यास ट्रॅफिक होणार नाही, नागरिकांना अडथळा होणार नाही.आधीच दिवा स्टेशन परिसरात रिक्षावाले आणि फेरीवाले यांच्या मनमानीमुळे सामान्य नागरिकाला नाहक त्रास सहन करावा लागतो. दिवा टर्निंग येथे थांबा नसतानाही रिक्षा चालक मुख्य टर्निंग वर गाड्या थांबून वाहतूक कोंडी करतात.हे छोटे छोटे प्रश्न आहेत.मात्र याकडे गांभीर्याने पाहिला हवं भविष्यातील मोठी वाहतूक कोंडी यातूनच निर्माण होणार आहे.शहराला शिस्त आतापासूनच लावायला हवी. दिवा शहरातील रुंदीकरणाच्या क्षमता संपलेल्या आहेत.दिवा शहरात अन्य बाह्य रस्ते निर्माण करणे अवघड आहे. अशा परिस्थितीत आहे त्याच रस्त्यांवरून वाहतूक सुरळीत करण्याचे मोठे आव्हान पालिकेसमोर असताना फेरीवाले आणि मनमानी पद्धतीने थांबा घेणारे रिक्षा चालक यांना आतापासूनच शिस्त लावायला हवी. रिक्षाचे थांबे ठरवून द्यायला हवेत.त्या थांब्यांचा वाहतुकीला अडथळा होणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी.मात्र हे पालिका प्रशासनाकडून होताना दिसत नाही.पालिका प्रशासनाने दिवा शहरातील नागरिकांना किमान पायाभूत सुविधा आणि आनंददायी जीवन देण्याच्या दृष्टीने पुढाकार घ्यायला हवा. बकाल स्वरूप प्राप्त होत असलेल्या दिवा शहराला नियोजनबद्ध शहर घडवण्याच्या दृष्टीने लक्ष घालायला हवं.पालिकेला हे आतापर्यंत जमलं नाही,ते जमवून घेण्याची मानसिकता पालिका प्रशासनाची हवी. केवळ दिवस भरायला येणारे अधिकारी दिव्याच्या विकासाच्या गोष्टी करू शकत नाहीत.पगार मिळतोय ना या मानसिकतेचे अधिकारी कर्मचारी दिव्याला नको आहेत. जबाबदारी टाळणाऱ्या प्रशासनातील लोकांमुळे दिव्यातील नागरिकांना सुविधा मिळत नाहीत असे आमचे मत आहे.ठाणे महापालिका प्रशासनाने दिव्यात येऊन पहावं...मनसेने शुक्रवारी एका दिवसात दिवा स्टेशन मोकळे करून दाखवलं... त्यातून पालिकेच्या पगारी कर्मचाऱ्यांनी बोध घ्यावा... आणि नागरिकांची सेवा कशा पद्धतीने करता येईल यासाठी वाटचाल करावी, हीच माफक अपेक्षा!

## धडाकेबाज युवा प्रतिष्ठान, दिवातर्फे दिवा शहरातील फेरीवाल्यांसाठी विविध उपक्रम






धडाकेबाज युवा प्रतिष्ठानच्या वतीने दिवा शहरातील फेरीवाल्यांसाठी विविध उपक्रम राबवण्यात आहे. या उपक्रमाचा लाभ शहरातील फेरीवाले घेत आहेत सदर प्रसंगी चे छायाचित्र.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३ | पान : ३
www.diwanews.com



## रिक्षा उलटून सहा जण जखमी

**ठाणे:** भिवंडी, काल्हेर येथून ठाणे स्टेशनकडे प्रवासी घेऊन निघालेली रिक्षा उलटल्याची घटना शुक्रवारी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास साकेत रोड, पोलीस मैदान जवळ घडली. या घटनेत रिक्षाचालक आणि पाच प्रवासी जखमी झाले असून त्यांना ठामपा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे.

# दिवा स्टेशन परिसरात पूर्वेला सुसज्ज शौचालय पालिकेने बांधावे

## - रोहिदास मुंडे



**दिवा:-** दिवा स्टेशन परिसरात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता दिवा पूर्वेला साबा रोड भागात सुसज्ज सुलभ शौचालय पालिकेमार्फत बांधण्यात यावे अशी मागणी दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केले आहे.

दिवा स्टेशनचा विकास होत असताना स्टेशन बाहेर नागरिकांच्या सोयी सुविधांसाठी वाढती गर्दी लक्षात घेऊन दिवा पूर्वेला साबे रोडच्या दिशेने सुलभ शौचालय ठाणे महानगरपालिकेने बांधावे अशी मागणी भाजपचे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केली आहे. या ठिकाणी शौचालय झाल्यास याचा फायदा शेकडो नागरिकांना होईल असे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

# आर एन विद्यालयात चंद्रयानचे थेट प्रक्षेपण






**दिवा:-** चंद्रयान तीन मोहीम यशस्वीरित्या पार पडल्या निमित्ताने दिवा भाजप मंडळा तर्फे आर एन विद्यालयात जिल्हा उपाध्यक्ष नरेश पवार, रेश्मा पवार यांनी मुलांना शाळेत चांद्रयानचे लाईव्ह प्रेक्षपण दाखवले.

चंद्रयान चंद्रावर उतरताना मुलांना लाईव्ह पाहता आले. भारताची चंद्रायन मोहीम यशस्वीरित्या पार पडल्यानंतर उपस्थितांनी फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष साजरा केल्याचे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी सांगितले

# पत्रकार प्रशांत सिनकर यांना 'राष्ट्रीय साहित्य शिरोमणी सन्मान' पुरस्कार जाहीर

## पश्चिम बंगाल येथील भारत सरकारशी सलग्न काम करणाऱ्या नव्या फाऊंडेशनचा पुरस्कार



**ठाणे :** पर्यावरण अभ्यासक आणि पत्रकार प्रशांत रविंद्र सिनकर यांना पश्चिम बंगाल येथील नव्या फाऊंडेशन यांच्या वतीने दिला दिला जाणारा राष्ट्रीय साहित्य शिरोमणी सन्मान २०२३ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्र सरकारशी सलग्न नव्या फाऊंडेशन ही संस्था काम करत असून, लवकरच या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

पत्रकारिता करत असताना पर्यावरण संवर्धनासाठी बहुमूल्य योगदान देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रशांत सिनकर यांना राष्ट्रीय साहित्य शिरोमणी सन्मान पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती नव्या फाऊंडेशनचे प्रमुख सल्लागार निरंजन गुप्ता यांनी दिली.

या अगोदर प्रशांत सिनकर यांना महाराष्ट्र शासनाचा शि.म.परांजपे पुरस्कार, नेपाळ येथील आंतराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत इको-२०१३ पुरस्कार, भारतरत्न राजीव गांधी पर्यावरण भूषण पुरस्कार, ठाणे महापालिकेचा ठाणे गुणिजन ठाणे गौरव अशा विविध पुरस्कारांनी गौरवलं आहे.

## गणेशभक्तांसाठी खुश खबर!

# दिवा शिवसेनेतर्फे कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील गणेशभक्तांसाठी मोफत बससेवा

**दिवा:-** दिवा शिवसेनेच्या माध्यमातून गणेश भक्तांसाठी कोकणात व पश्चिम महाराष्ट्रात जाण्यासाठी मोफत बस सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. यामुळे शहरातील गणेश भक्तांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सव निमित्त दिवा शहरातून गणेश भक्तांसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने माणगाव,महाड, पोलादपूर, खेड, मंडणगड, दापोली, गुहागर, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापूर, खारेपाटण, तळेरे, वैभववाडी, कणकवली, कुडाळ, मालवण, कसालमार्गे, सातारा (पाटण, पवनगाव), कराड-सांगली, कोल्हापूर (आजरा, शाहूवाडी, कोवाड) येथील नागरिकांसाठी मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

बुकिंगसाठी जवळच्या शिवसेना शाखेमध्ये संपर्क साधण्याचे आवाहन दिवा शिवसेनेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

सर्व बस १७ सप्टेंबर रोजी सोडण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



## ज्येष्ठ पत्रकार देवेंद्र गोरेगावकर यांचे निधन

**ठाणे:** मराठी वृत्तपत्रातून पत्रकारितेची सुरुवात करून इंग्रजी वृत्तपत्रात आपला आगळावेगळा ठसा उमठवणारे ठाण्यातील ज्येष्ठ पत्रकार देवेंद्र तानाजी गोरेगावकर यांचे बुधवारी रात्री हृदयविकाराचे झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी ते ५८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई- वडील, पत्नी, दोन मुली असा परिवार आहे.

## चरई शिवसेना शाखेच्या वतीने ५०० हुन अधिक गरजूंना धान्य वाटप



**ठाणे:** शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख दिवंगत आनंद दिघे यांच्या २२ व्या पुण्यतिथी निमित्त खासदार राजन विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली चरई शिवसेना शाखेच्या वतीने शनिवारी ५०० हुन अधिक गरीब गरजू नागरिकांना धान्य वाटप करण्यात आले. ठाणे लोकसभा संपर्क प्रमुख मधुकर देशमुख, ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, माजी नगरसेवक मंदार विचारे, युवासेना अधिकारी किरण जाधव, योगेश सावंत, विभाग प्रमुख जिवाजी कदम, शाखा प्रमुख राजू मोरे, धोंडू मोरे, समन्वयक राम काळे, सुधीर बेलोसे, बाबू शेलार, रवी लोंढे, विनायक आंबेकर, संजय कर्णिक, दीपक चोणकर, गणेश कुंभार तसेच इतर शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाणे जिल्हा न्यायालयातील हिरकणी कक्षाचे उद्घाटन

**ठाणे :** जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या वतीने ठाणे जिल्हा न्यायालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश गौरी गोडसे व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभय मंत्री यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले .

महिलांचे सबलीकरण व बालकांचे विकास योजनेंतर्गत जिल्ह्यांमध्ये गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी महिलांना आपल्या समवेत असलेल्या बालकांना स्तनपान करण्यासाठी “ हिरकणी कक्ष”ची उभारणी महिला व बालविकास विभाग व जिल्हा नियोजन समितीच्या ३% निधी मधून ठाणे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या मार्फत केले जात आहे. ठाणे जिल्हा न्यायालयाच्या आवारात सर्व सोयीयुक्त अशा कक्षाची उभारणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी ठाणे व पालघर जिल्ह्यातील सर्व न्यायधीश उपस्थित होते. या सुविधांची गरज सर्व ठिकाणी असावी, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे यांनी केले. ठाणे जिल्ह्यातील सर्व न्यायालयांच्या आवारामध्ये या कक्षाची उभारणी करावी, असे निर्देश दिले.संबंधित न्यायालयीन अधिकारी यांना महिला व बालविकास विभागास कक्ष उभारणी करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे व समन्वय साधून काम करण्याबाबत आदेशित केले.



जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड यांनी महिला व बालविकास विभागातर्फे स्मृतीचिन्ह भेट देवून पाहुण्यांचा स्वागत केले. या प्रकारच्या उपक्रमास न्यायपालिकेने ज्या संवेदनशिलतेने न्यायालयात येणाऱ्या मातांचा विचार करुन कक्ष उभारणीस परवानगी दिली व त्याचप्रमाणे जिल्ह्यातील इतर ठिकाणी देखील अडचणी लक्षात घेवून पुढील आदेश दिले, याबाबत विभागातर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सूर्यवंशी, ठाणे जिल्हा न्यायालयाचे रजिस्ट्रार कंठे आणि महिला व बालविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# न्यायालयाचे आदेश डावलून अनधिकृत इमारतींना वीज कनेक्शन देणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा – संजय घाडीगांवकर

**ठाणे: ठाणे महापालिका प्रशासन ज्या अनधिकृत इमारतींवर कारवाई करत आहे आणि ज्या इमारतींवर हायकोर्टाच्या आदेशानुसार कारवाई होत आहे, अशा इमारतींना वीज कनेक्शन देण्याचा प्रयत्न महावितरणचे काही अधिकारी करत आहेत त्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय घाडीगांवकर यांनी महावितरणकडे केली आहे.**



महावितरण चे ठाणे सर्कल चे अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या पत्रात घाडीगांवकर यांनी म्हटले आहे की, आपणास या पत्राच्या अनुशंगाने निदर्शनास आणून देतो की, राहुल चंद्रकांत पवार यांचे आपणास २३-८-२०२३ दिलेले सत्यप्रतिज्ञापत्रानुसार लोकमान्य नगर पाडा क्रमांक १ येथील हनुमान मंदिर जवळील आणि साई योग अपार्टमेंट शेजारील अनअधिकृत इमारतीचे बांधकाम उच्च न्यायालयाचे आदेश ५-८-२००९ नुसार निष्कासन कारवाई झालेल्या आणि २०-३-२०२३ रोजी ठाणे महापालिकेने वर्तक नगर पोलीस स्टेशन यांनी १९६६ अंतर्गत दाखल केलेली फिर्याद ८६/२०२३ नुसार आपण उपरोक्त अन अधिकृत इमारतीला विद्युत् जोडणी देवू नये त्याचबरोबर ठाणे महापालिका क्षेत्रात कोठेही अनधिकृत इमारतीची बांधकामे चालु आहेत, तेथेही विद्युत् जोडणी देवू नये असे घाडीगांवकर यांनी म्हटले आहे. उपरोक्त अन अधिकृत इमारतीला विद्युत् जोडणी देण्यासाठी आपले कार्यकारी अभियंता सतीश जाधव प्रयत्नशील असल्याचे संदर्भ १ नुसार समजते त्याबाबत त्यांचेवर योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या उपरोक्त आणि अन्य कोणत्याही निर्माणाधीन अनाधिकृत इमारतीला ज्यावर ठाणे महापालिका कायदेशीर कारवाई करीत आहे त्यांना विद्युत जोडणी देवू नये आणि याबाबत आपल्या सर्व विभागाना आणि म.रा.वि.वि.कंपनीकडून नियुक्त इतर खाजगी संस्थाना तात्काळ निर्देशित करावे .सबंधित सर्व उपरोक्त आदेश तपासूनच मग कारवाई करावी. ही विनंती. अन्यथा म.रा.वि.वि. कंपनी विरोधात उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अवमानाबाबत तात्काळ अवमान याचिका दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामाची जबाबदारी आपली व सबंधित अधिकारी यांची असेल याची नोंद घ्यावी.सबंधित सर्व आदेश तपासूनच मग कारवाई करावी असे घाडीगांवकर यांनी म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३
पान : ५
www.diwanews.com

## अत्याचार करणाऱ्या मौलानाला ५ वर्षे सक्तमजुरी

**ठाणे:** मदरसा येथे शिक्षण घेण्यास आलेल्या एका अल्पवयीन ५ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या मोहम्मद सरताज लतीफुर रहमान शेख या मौलानाला ठाणे जिल्हा अतिरिक्त न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांनी गुरुवारी दोषी ठरवत, ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. अशी माहिती विशेष सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी दिली. ही घटना मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती.



# जलवाहतुकीसाठी ठाणे लवकर होणार सज्ज



## कोलशेत येथे जेट्टीच्या कामाला लवकर सुरुवात

**ठाणे:** ठाणे शहरातील वाहतूक कोंडीमुळे शहरात होणारे वाढते प्रदूषण लक्षात घेता जलवाहतुकीला चालना मिळावी, यासाठी खासदार राजन विचारे हे आमदार असल्यापासून प्रयत्न करीत आहेत. त्याला अखेर यश आले असून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाच्या सागरमाला व राज्य शासनाच्या मदतीने उभ्या राहणाऱ्या जेट्टींना १०० कोटीला प्रशासकीय मान्यता मिळाली असून कोलशेत, भाईंदर, काल्हेर व कल्याण या चार ठिकाणी जेट्टीची कामे सुरू होत आहेत. यामधील कोलशेत येथील जेट्टीची पाहणी करण्यात आली. या कोलशेत जेट्टीसाठी ३६ कोटीची मान्यता मिळाली असून याठिकाणी रो-रो व प्रवासी जेट्टीच्या कामाला आवश्यक लागणाऱ्या पर्यावरण खात्याच्या परवानग्या २० जून २०२२ रोजी व ची मिळाली असून सदर काम बफर झोन मध्ये असल्याने हायकोर्टाची परवानगी मिळणे बाकी आहे. निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण झालेले आहे परवानगी मिळताच कोलशेत व खाडी पलीकडे काल्हेर येथे याचे काम सुरू होणार आहे. तसेच येथे येणाऱ्या प्रवाशांसाठी प्रतीक्षालय व मार्गिका तयार करून या ठिकाणी चौपाटी विकसित करण्यात आलेली आहे. याचे काम २०२१ पासून सुरू होऊन या चौपाटीसाठी ५ कोटी निधी खर्च करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रवाशांसाठी शेड, येण्यासाठी मार्ग, पार्किंग व्यवस्था, प्लॅटफॉर्मवर फरशी, फ्लेमिंगो स्टॅच्यू, रेलिंग व इलेक्ट्रिकल वर्क व इतर सुविधा करण्यात आल्या आहेत.

या पाहणी दौऱ्याकरिता खासदार राजन विचारे, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता अजित मोहिते, उप अभियंता प्रशांत सानप, कॅप्टन सुरज नाईक, विधानसभा संपर्क प्रमुख नरेश मणेरा, उपजिल्हा प्रमुख सुनील पाटील, उप शहर प्रमुख संतोष शिर्के, दिपक साळवी, विभाग प्रमुख प्रदीप पूर्णेकर, माया पाटील, शाखा प्रमुख दिनेश जाबर, संजय जाधव, युवासेना अधिकारी किरण जाधव, उप जिल्हा अधिकारी ठाणे शहर अर्जुनसिंग डाभी, विभाग संघटक ज्योती कदम, अनिता हिलाल, उषा बोरुडे व इतर शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घोडबंदर जेट्टी वरून पर्यटकांसाठी वॉटर स्पोर्ट्स व फेरी बोट सुरू करा

### -खासदार राजन विचारे

**ठाणे: घोडबंदर येथे तयार झालेल्या जेटीवरून प्रवासी बोट व पर्यटकांसाठी वॉटर स्पोर्ट्स, फेरीबोट सुरू करा अशी मागणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे खासदार राजन विचारे यांनी केलेली आहे.**

गुरुवारी या जेट्टीची खासदार राजन विचारे यांनी पाहणी केली असून याचे काम अंतिम टप्प्यात पूर्ण होत असल्याने लवकरात लवकर या सुविधा सुरू कराव्या असेही म्हटले आहे. तसेच महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांना खासदार राजन विचारे यांनी ज्या काही सेवा सुरु कराल त्यामध्ये स्थानिक नागरिकांना प्राधान्य द्या जेणेकरून त्यांनाही रोजगार उपलब्ध होईल अशा सूचना त्यावेळी देण्यात आल्या.

केंद्र शासनाच्या सागरमाला व राज्य शासनाच्या मदतीने ५०-५० टक्के अनुदानाने या जेट्टीचे सन २०१८ रोजी काम सुरू करण्यात आले होते. या जेट्टीची लांबी ५०.५७ .४० मीटर व रूंदी ३१.५०७.४० मीटर असून एल टाईप मध्ये ही जेट्टी विकसित केलेली आहे. या कामासाठी ७ कोटी ३५ लाख खर्च करण्यात आले. असून या जेट्टी कडे जाणारा २५० मीटरचा रोड विकसित करण्यात आलेला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३ पान : ६
www.diwanews.com

## पात्र लाभार्थ्यांना होणार अनुदानाचे गणेशोत्सवापूर्वी वाटप

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत महिला व बालविकास योजनेच्या माध्यमातून विविध योजनांमध्ये पात्र ठरलेल्या १ हजार ५१८ लाभार्थी महिलांना गणेशोत्सवापूर्वी अनुदान मिळणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना गणेशोत्सवापूर्वी अनुदानाचे वाटप करावे अशी मागणी शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती. त्याच्यावर आयुक्तांनी तात्काळ कार्यवाही केल्याने अनुदान वाटप करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पाच वर्षांच्या गॅरंटी अंतर्गत संगमेश्वर-देवरुख साखरपा रस्त्याच्या खराब झालेल्या वरच्या थराचे काम संबंधित ठेकेदाराकडून करून घ्या

## गाव विकास समितीचे जिल्हाध्यक्ष श्यामकर्ण भोपळकर यांची मागणी



**देवरुख:-** संगमेश्वर-देवरुख-साखरपा रस्त्याचा वरचा खराब झालेला संपूर्ण लेअर ५ वर्षांच्या गॅरंटी अंतर्गत संबंधित ठेकेदाराकडून नव्याने टाकून घ्यावा अशी मागणी गाव विकास समितीचे रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष श्यामकर्ण भोपळकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

रस्त्याला ५ वर्षांची हमी असताना हा रस्ता त्याआधीच खराब झाला असून या रस्त्याचे कामच निकृष्ट झाल्याने ही स्थिती निर्माण झाली असल्याचे भोपळकर यांनी म्हटले आहे.

अनेक वर्षांच्या मागणी नंतर संगमेश्वर देवरुख साखरपा या रस्त्याचे रुंदीकरण झाले खरे मात्र या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट झाल्याचे आता स्पष्ट होत आहे असे भोपळकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

संगमेश्वर देवरुख साखरपा या रस्त्याला पाच वर्षाची गॅरंटी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेली असताना त्यापूर्वीच या रस्त्याचा संपूर्ण वरचा लेयर हा खराब झालेला आहे.

परिणामी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून संगमेश्वर-देवरुख-साखरपा या रस्त्याला संपूर्ण नवीन थर टाकून घ्यावा.वरवर खड्डे भरण्याचे काम करू नये.साखरपा ते संगमेश्वर पूर्ण नवा थर या रस्त्याला टाकावा. नागरिकांची फसवणूक होणार नाही याची काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाने घ्यावी अशी मागणी भोपळकर यांनी गाव विकास समितीच्या माध्यमातून केली आहे. हा रस्ता ज्या कंपनीने बनवला त्यांच्याकडून संपूर्ण रस्त्याचे काम करून घेण्यात यावे. रस्त्यावर दिशादर्शक फलक,रस्त्याच्या कामाची एकूण रक्कम याचे बोर्ड अद्याप लागलेले नाहीत. त्याबाबत ही संबंधितांना सूचना देण्यात याव्यात असेही श्यामकर्ण भोपळकर यांनी म्हटले आहे.

# आगरी महिला शक्ति प्रतिष्ठानच्या माध्यमातून साई सेवा रुग्णालय सुरु

## शैलेश पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



**दिवा:-** आगरी महिला शक्ती प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिवा येथे साई सेवा रुग्णालयाचे उद्घाटन शिवसेनेचे मा.नगरसेवक व उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर रुग्णालय मल्टीस्पेशालिटी असून या ठिकाणी आय. सी. यू. विभाग देखील उपलब्ध आहे. सामाजिक दृष्ट्या हे रुग्णालय इतर रुग्णालया पेक्षा मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत उपयुक्त व्हावे याचा विचार करूनच आगरी महिला शक्ति प्रतिष्ठानच्या सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हे रुग्णालय सुरू केले आहे, असे प्रतिष्ठानच्या अध्यक्ष व संस्थापिका उषाताई मुंडे यांनी सागितले. यावेळी रंजना मुंडे, सविता वायले, पुनम मुंडे, दीपिका मुंडे, सोनम मुंडे, भारती पाटील, ज्योती म्हात्रे, भारती वसंत म्हात्रे, प्रीती पाटील, योगिता मुंडे, रंजना तांडेल आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. रुग्णालयांतील सुविधा दिवा वासियांसाठी उपलब्ध केल्याबद्दल शैलेश पाटील यांनी कौतुक करत दिवेकर नागरिकांसाठी एक उपयुक्त असे रुग्णालय सुरू झाल्याबद्दल संस्थेचे पाटील यांनी आभार मानले.



**ठाणे स्थानकातील पादचारी पुलावर गर्डर लॉंचिंग**

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकात कल्याण व मुंबई विशेष असलेले ६० वर्षांपूर्वीचे जुने पादचारी पुल आयआयटीने दिलेल्या अहवालानुसार धोकादायक झाला होता. त्यानंतर आता या पुलाचे काम नव्याने सुरु करण्यात आले असून या पुलावर गर्डर यशस्वीरित्या टाकण्यात आला आहे.



# डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशन राबविणार महिलांमध्ये जनजागृती करीता 'एक कदम और' ही संकल्पना

**मुंबई:– स्वातंत्र्य दिनानिमित्त डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशनने १५ ऑगस्ट २०२३ रोजी सनविले बँक्वेट्स वरळी येथे एक कदम और या नावाने नवीन प्रकल्पाची सुरुवात केली.हि संकल्पना मुळात ''भारतमाता: महिलांचे आरोग्य'' अशी आहे. अभिनेते दिग्दर्शक श्री विजय पाटकर आणि अध्यात्मिक व प्रेरक वक्ते श्री. शशिकांत खामकर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**






स्त्रिया कुटुंबाच्या सर्वांगीण आरोग्याचा आधारस्तंभ आहेत आणि यात शंका नाही की मुलांचे, कुटुंबांचे आणि समाजाचे आरोग्य मोठ्या प्रमाणात महिलांच्या आरोग्याशी निगडीत आहे. जगाच्या लोकसंख्येच्या ५०% महिला आहेत, तथापि, त्यांचे आरोग्य अजूनही समाजात दुर्लक्षित विषय आहे. गर्भधारणा आणि बाळंतपण यासह अनेक स्त्रीरोगविषयक परिस्थिती विम्याद्वारे संरक्षित नाहीत किंवा खूप जास्त प्रीमियमवर उपलब्ध आहेत हे स्त्रियांच्या आरोग्याविषयीचे अज्ञान आहे.हा विषय गांभीर्याने हाताळला जाणे आवश्यक आहे आणि हा कार्यक्रम जनजागृतीच्या दिशेने हि संकल्पना पहिले पाऊल होय.

डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशनच्या संचालिका श्रीमती कविता बागवे यांनी मासिक पाळी, वंध्यत्व, गर्भधारणेदरम्यान, गर्भधारणेनंतर आणि रजोनिवृत्तीनंतर महिलांना भेडसावणारी आव्हाने याबाबत अभ्यासपूर्वक भाष्य केले. महिलांच्या जीवनातील वैयक्तिक, व्यावसायिक, सामाजिक, भावनिक आणि आर्थिक भागावर याचा कसा परिणाम होतो आणि एक छोटासा बदल अनेकांच्या जीवनात आनंद कसा आणू शकतो हे त्यांनी स्पष्ट केले.एक कदम और डिव्हाईन विन्सपायर फाऊंडेशनचा एक भाग म्हणून महिलांसाठी जनजागृती मोहीम राबवणार आहे. तसेच, डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशन गरजू महिलांसाठी मोफत प्रसूतीसाठी वैद्यकीय मदत करेल.

विजय पाटकर यांनी डिव्हाईन विन्सपायर फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. तसेच, त्यांनी या नवीन उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले आणि श्रीमती कविता बागवे यांना महिलांच्या आरोग्यासाठी उचललेल्या पावलाबद्दल गौरव उद्गार काढलेत. स्त्रिया सर्वांची काळजी घेतात पण स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असल्याने जागरूकता आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. श्री.शशिकांत खामकर यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून आशीर्वाद व भावी योजनांसाठी शुभेच्छा दिल्यात.

**अनेक नामांकित सेवाभावी संस्था या कार्यक्रमाचा भाग आहेत . त्यांच्या करायचा गौरव म्हणून त् डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशनने त्यांनी केलेल्या कामाचे आणि नवीन उपक्रमाचे कौतुक केले व त्यांचा सन्मान केला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डिव्हाईन विन्सपायर फाऊंडेशनने सर्व सहभागी संस्थांच्या कार्याची पोच पावती दिली आणि त्यांचा सत्कार केला. अनेक नामवंत उद्योजक व विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तीमत्व या कार्यक्रमात सहभागी झाले होते. डिव्हाईन विन्सपायर फाउंडेशनचे संचालक डॉ. आशिष दामा यांनी सर्व पाहुण्यांना संबोधित केले आणि डिव्हाईन विन्सपायर फाऊंडेशनने केलेल्या कार्याबद्दल आणि यामुळे अनेकांच्या जीवनात कसा परिणाम झाला या विषयी भाषणात सांगितले.**

**अखेर ४५ सफाई कामगारांना दोन महिन्यांचे वेतन मिळणार**

**ठाणे: महापालिकेच्या सफाई खात्यात कंत्राटी पद्धतीने कार्य करणाऱ्या सुमारे ४५ सफाई कामगारांना थकीत तीन महिन्यांपैकी दोन महिन्यांचे वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे त्या कामगारांना दिलासा मिळाला.** महापालिकेचे उपायुक्त तुषार पवार यांची कामगारांच्या प्रतिनिधींसमवेत भेट घेतली. तसेच तातडीने वेतन देण्याबाबत आदेश देण्याची विनंती केली.

# ज्योती पाटील यांच्या वतीने दहीहंडी सराव शिबिराला सुरवात

# जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांची प्रमुख उपस्थिती





**दिवा:–** भारतीय जनता पार्टीच्या दिवा शहर मंडळ महिला अध्यक्ष ज्योती पाटील यांच्या वतीने गोविंद पथकासाठी सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिराची सुरवात शनिवारी झाली.यावेळी भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले,मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे,विजय भोईर यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शिबिरामध्ये जास्तीत जास्त गोविंदा मंडळांनी सहभाग घ्यावा असे आवाहन ज्योती पाटील यांनी केले आहे .

तरुण गोविंदांना योग्य पध्दतीने दहीहंडी उत्सव साजरा करता यावा यासाठी ज्योती पाटील यांनी हा उपक्रम सुरू केला आहे. या सराव शिबिरामध्ये मंडळांना लागणाऱ्या सर्व गोष्टी समजावून व त्यांच्यासाठी मानाची ट्रॉफी, ॲम्बुलन्सची सुविधा, मेडिकल किट, इन्शुरन्स या सर्व गोष्टींचे नियोजन करण्यात आले आहे. दिव्यातील जास्तीत जास्त मंडळानी या सराव शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन ज्योती पाटील यांनी केले आहे.







